Civil M.A. 6/2026
Exh. 3

# कागद यादी

दिवाणी किरकोळ अर्ज नं.     /२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल

यांचे कोर्टात

श्री. जगजित श्रीकांत भोसले — अर्जदार

विरूध्द

श्री. राजेंद्र नानासो चव्हाण — वि.प.

यातील अर्जदार तर्फे दाखल कागद यादी खालीलप्रमाणे,

| अ.नं. | तपशील | तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | रे.क.नं. १५६/२०२५ मधील नि. ५ व त्यावरील आदेश | ३१/०१/२०२६ | स.शि.न. |
| 2. | अर्जदार यांनी मा. जिल्हा पोलिस प्रमुख यांना दिलेला तक्रार अर्ज | २३/०१/२०२६ | पोहच |
| 3. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 4. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 5. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 6. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 7. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 8. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 9. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 10. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 11. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो | २२/०१/२०२६ | पॉझिटिव्ह |
| 12. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटोची सी.डी. | २२/०१/२०२६ | अस्सल |

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.13 16:52:12 +0530

Scanned with OKEN Scanner

| अ.नं. | तपशील | तारीख | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| 13. | दावा मिळकतीत चालु असलेले बांधकामचे फोटो व सी.डी. चे बिल. | २२/०१/२०२६ | अस्सल |
| 14 | (65 ब) चे प्रमाणपत्र | 22/01/2026 | अस्सल |
| | | | |
| | | | |

Order
Filed
C.J.J.D.
Dt.13.2.26

येणे प्रमाणे एकूण १४ कागद हजर असे.

कोल्हापुर

ता. 3/०२/२०२६

मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, कागल.

दिवाणी व ~~फौजदारी~~ नक्कल रजिस्टर नंबर ४०/२५ अ.नं. (1) अर्जदारतर्फे [illegible]

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव | [illegible] | 31/1/26 सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, कागल. |
| नक्कलेस अर्ज दाखल तारीख | पंचवीस जानेवारी २५/१/२०२६ | |
| अर्ज पूर्ण झालेची तारीख | एकतीस जानेवारी ३१/१/२०२६ | |
| नक्कल नेणेसाठी अर्जदारास समज दिलेली तारीख | तीस जानेवारी ३०/१/२०२६ | |
| नक्कल तयार झालेली तारीख | एकतीस जानेवारी ३१/१/२०२६ | |
| नक्कल दिलेली तारीख | एकतीस जानेवारी ३१/१/२०२६ | |

झेरॉक्स नक्कल निशाण - ५

| एकूण पाने | पानाचा झेरॉक्स दर | एकुण रक्कम |
|---|---|---|
| ११ | ४/- | ४४/- |

आज अंतिम पर्यंत कॅम्प रजिस्टर पाहता
फेटाळ कायदा नाही.
दि ३०/१०/२०२५ Curdale
नि ५१३
Assistant Superintendent रे.क.नं.९५८ /२०२५

मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल

यांचे कोर्टात

| | |
|---|---|
| श्री. जगजित श्रीकांत भोसले<br>व.व. ४४, धंदा – शेती व व्यवसाय,<br>रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली,<br>रविवार पेठ, कोल्हापूर | वादी |

विरुध्द

| | |
|---|---|
| श्री. राजेंद्र नानासो चव्हाण<br>व.व. ४५, धंदा – नोकरी,<br>रा. पाटील गल्ली, मुरगुड,<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | प्रतिवादी |

सी.पी.सी. ऑ. ३९ रूल १ व २ सहकलम १५१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई करीता अर्ज

यातील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात की –

१) मिळकतीचे वर्णन :–

मुरगुड ता. कागल, जि. कोल्हापुर येथील गट नं. १९६/२ एकुण क्षेत्र हे. ०–१९.२० आर पैकी क्षेत्र हे. ०–०५.६१ आर ही मिळकत त्यासी चतु:सिमा:–

पूर्वेस :– अंतर्गत रस्ता
पश्चिमेस :– अंतर्गत रस्ता
दक्षिणेस :– मेंडके यांची मिळकत
उत्तरेस :– अक्षय कृष्णात प्रभावळे यांची मिळकत

Chavan

27/10/25
Superintendent
Civil Court Sr.Dn.Kolhapur

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यामधील बेकायदेशीर चालु असलेले आर.सी.सी. बांधकाम या दावेचा विषय असून त्यास येथून पुढे दावा मिळकत असे संबोधणेचे आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद मिळकत यातील वादीचे कायदेशीर मालकी व वहीवाटीची मिळकत होय.

३) वर कलम १ मध्ये नमुद मिळकत मुळची अन्तोन लुईस फर्नांडीस वगैरे यांचे मालकी व वहीवाटीची होय. सदर अन्तोन लुईस फर्नान्डीस वगैरे यांनी सदर मिळकत प्रस्तुत वादी यांना रजी. दस्त नं. २७४० ता. ८/९/२०२३ इा रोजीचे खरेदीपत्राने कायम खुष खरेदी दिलेली आहे. सदर खरेदीचा मोबदला रू. १०,३०,०००/— वादीने अन्तोन लुईस फर्नान्डीस यांना रितसर अदा केला आहे. सदर खरेदीपत्राप्रमाणे दावा मिळकतीचे सातबारापत्रकी वादी यांचे नांवाची नोंदी झालेली आहे.

एकंदर दावा मिळकत वादी यांचे कायदेशीर मालकी व वहीवाटीची मिळकत होय.

४) प्रस्तुत प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही कायदेशीर हक्क वा संबंध नव्हता व नाही.

५). सदरप्रमाणे वस्तुस्थिती असताना प्रतिवादी यांनी माहे ऑगस्ट २०२५ मध्ये दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने खडडे काढणेस सुरवात केली. सदर बाब वादी यांना समजताच वादी हे त्वरीत दावा मिळकतीचे ठिकाणी जाऊन प्रतिवादीस भेटले व दावा मिळकत वादीचे मालकी व वहीवाटीची असलेचे स्पष्ट करून बेकायदेशीर बांधकाम थांबवले. सदरवेळी प्रतिवादीने वादीचे कागदपत्रे पाहुन गैरसमजुतीने बांधकाम चालु केले आहे, असे सांगुन सर्व साहीत्य घेवुन जातो बांधकाम करत नाही असे वादीकडे कबुल केले.

६) तथापी ता. ११/१०/२०२५ रोजी वादी हे दावा मिळकतीमध्ये गेले असता तेथे प्रतिवादीचे बांधकाम चालु असलचे दिसुन आले. वास्तविक वादी हे कोल्हापुर येथे राहणेस असलेने व दाव मिळकती पासुन दुर राहणेस अलेने वादीस सदर बांधकामाबाबत त्वरीत समजले नाही. तथापी प्रतिवादीने वादीचे माघारी घाई गडबडीत बेकायदेशीरपणे, विनापरवाना, अनाधिकाराने, अतिक्रमण करणेचे इराद्याने दावा मिळकतीमध्ये बांधकाम सुरू ठेवले होते. सदरचे प्रतिवादीचे कृत्य बेकायदेशीर व अनाधिकाराचे असे होते व आहे.

२/—

Superintendent
Civil Court Sr.Dn.Kolhapur

७) सदरवेळी वादीने प्रतिवादीस जाब विचारला असता प्रतिवादीने वरील प्रमाणे पुन्हा बांधकाम करत नाही, केलेले बांधकाम काढुन घेतो असे कबुल केले.

वादीचे मालकी व वहीवाटीचे मिळकतीमध्ये प्रतिवादीला बांधकाम करण्याचा वा वादीचे वहीवाटीस हरकत व अडथळा करणेचा कोणताही अधिकार नाही.

८) ता. १९/१०/२०२५ रोजी वादी पुन्हा दावा मिळकतीचे ठिकाणी गेले असता सदर ठिकाणी बांधकाम बंद होते. मात्र प्रतिवादी यांनी केलेले बांधकाम काढुन नेलेले नव्हते. त्याकारणांने वादीने प्रतिवादीला भेटुन त्याबाबत विचारणा केली असता प्रतिवादी यांनी वादीस बांधकाम करणारच, कोण अडवते ते बघतोच जीवंत सोडणार नाही, तुला ठार मारतो अशी धमकी वादीला दिली. सदर प्रकारामुळे वादीवर भयानक मानसिक दडपण आले व वादी घरी आले.

९) तद्नंतर ता. २५/१०/२०२५ इा रोजी वादीने मा. पोलिस निरीक्षक मुरगुड व व ता. २४/१०/२०२५ इा रोजी मा. मुख्याधिकारी, मुरगुड नगरपरिषद यांचेकडे लेखी तक्रार अर्ज प्रतिवादी विरूध्द दाखल केला. तथापी प्रतिवादी यांची राजकीय पुढाऱ्यांशी ओळखी असलेने वादीचे तक्रारीची योग्य दखल घेतली गेली नाही.

१०) प्रतिवादी हा गुंड प्रवृत्तीचा व कायदा न पाळणारा इसम आहे. वादीचे मालकीचे मिळकतीशी प्रतिवादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. तथापी दावा मिळकत हडप करणेचे दुष्ट हेतुने प्रतिवादीने सदरचे बांधकाम सुरू केलेले आहे.

त्याकारणाने प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये केलेले बांधकाम पाडुन टाकणेबाबत मॅन्डेटरी मनाई आदेश होवुन मिळणेकरीता व प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये, वादीचे दावा मिळकती मधील वहीवाटीस हरकत व अडथळा करू नये वा वादीचे वहिवाटीस हरकत होईल असे कोणतेही कृत्य करू नये अशी प्रतिवादी व तर्फे इसमांविरूध्द कायम मनाई ताकिद होवुन मिळणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

११) सदरप्रमाणे तुर्तातुर्त मनाई ताकीद झालेने प्र.वादीचे कोणतेही नुकसान होणे न्यायाचे दृष्टीने संभव देखील नाही. याउलट सदरप्रमाणे मनाई ताकीद न झालेस वादीचे कायदेशीर हक्क डावलले जाणार असून कधीही भरून न निघणारे नुकसान होणार आहे. तसेच वादीचे दावेचा हेतु नष्ट होणार आहे.

27.10.25
Superintendent
Civil Court Sr.Dn.Kolhapur

१२) प्रस्तुत वादीस प्रायमाफेसी केस असून अंतीम यशाची खात्री आहे. तसेच बॅलन्स ऑफ कनव्हीनियन्सदेखील वादीचे बाजूने आहे. तसेच मल्टीप्लायसीटी ऑफ प्रोसीडींग टाळणे करीता देखील सदरकामी तुर्तातुर्त मनाई ताकीद होणे आवश्यक व अगत्याचे आहे.

१३) प्रस्तुत वादीस प्र.वादीकडून कोणतीही कॅव्हेटची नोटीस मिळालेली नाही.

१४) <u>सबब, वादीची विनंती की,</u>

अ. वादीचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब. दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये, वादीचे दावा मिळकती मधील वहीवाटीस हरकत व अडथळा करू नये वा वादीचे वहिवाटीस हरकत होईल असे कोणतेही कृत्य करू नये अशी प्रतिवादी व तर्फे इसमांविरुध्द या दावेचे निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकदी होवून मिळावी.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल.

ता. २७/१०/२०२५

## <u>ॲफिडेव्हीट</u>

मी वादी श्री. जगजित श्रीकांत भोसले व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय, रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापुर शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हीट.

आज मुक्कामी कागल.

ता. २७/१०/२०२५

27.10.25

Superintendent
Civil Court Sr.Dn.Kolhapur

प्रतिज्ञा

मी वादी श्री. जगजित श्रीकांत भोसले व.व. ४४, धंदा — शेती व व्यवसाय, रा. ९४८, बी वॉर्ड, कापडे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.
कागल.
ता. २७/१०/२०२५

I know the deponent.
(Adv M.V. Sawant)

Solemnly affirmed before me by Shri/Smt. Jagjit Shrikant Bhosale of Raviwar Peth, Kolhapur Occup. Agri. & business who is identified by Shri M V Sawant Adv. whom I Know Personally on 27/10/25

Superintendent

order

Perused Application & documents annexed. Heard Ld Advocate for Plaintiff.

No extra-ordinary circumstances made out for grant of ex-parte Relief. The Defendant needs to be heard. Hence Issue show cause notice to Defendants as to why T.I should not be granted r/o — 6/11/25.

E.P & S.D if any allowed.

CJJD. Kagal
31/10/25

**R.C.S.No. 156/2025**

**Jagajit Shrikant Bhosale Vs Rajendra Nanaso Chavan**

**CNR - MHKO130020412025**

**ORDER PASSED BELOW EXH.05 and Exh. 11**
**(Dt. 11/12/2025)**

1. This is an application vide Order 39 Rule 1 and 2 of the Code of Civil Procedure. By way of instant application Plaintiff/applicant has prayed to restrain the Defendant from interfering with his possession over the suit property. It is submitted that suit property is land Gat No. 196/2 total admeasuring 0.19.20 R and out of it 0.05.61 R and bounded as follows.

Towards East – Internal Road,

Towards West – Internal Road,

Towards South – Property of Shri. Mendke,

Towards North – Property of Shri Akshay Krushnat Prabhavle. (here-in-after referred as suit property for the sake of brevity).

2. It is submitted that the issue in the present suit and application is with respect to illegal construction carried out by Defendant in the suit property.

3. It is submitted that suit property was originally owned by Anton Luis Farnandis and others. Anton Luis Farnandis and others by way of registered Sale Deed No. 2740 dated 08/09/2023 sold the suit property for consideration of Rs. 10,30,000/- to the Plaintiff and accordingly the name of Plaintiff was mutated over the 7/12 extract of the suit property on the basis of Sale Deed. Since then Plaintiff is the owner and possessor of the suit land. It is submitted that Defendant has no right and interest in the suit property. Despite this

fact in August 2025 the Defendant started digging the soil for erecting pillars in the suit property in August 2025 and now the construction is in progress. The Plaintiff got knowledge about the construction on 10/10/2025 since he is residing at Kolhapur and requested Defendant to stop the illegal construction but the Defendant did not pay any heed. Thereafter Plaintiff by way of written complaint to the Police Inspector, Murgud on 25/10/2025 and Chief Officer on 24/10/2025 intimated of the illegal construction but no cognizance was taken. Therefore the Plaintiff was constrained to file the present suit along with application for temporary injunction.

4. The Defendant filed his Written Statement at Exh. 24 and opposed the application and denied the averments therein. It is submitted that the construction carried out by Defendant is not illegal. It is submitted that the construction is being carried out by Defendant in Gat No. 198/1/B which is owned by the Defendants. It is denied that the construction carried out by Plaintiff is in Gat No. 196/2. It is submitted that if the prayer of Plaintiff with respect to temporary injunction is allowed then it will cause much hardship and irreparable loss to the Defendants because the construction is already completed half way. It is submitted that there is no contention of Plaintiff with respect to encroachment. The suit is barred for non joinder of the other coparcener in the suit property. Therefore the application being without merit be rejected.

5. Considering the pleadings in the plaint, Written Statement and Say following points arise for my determination to which I record my findings with reasons.

| | POINTS | | FINDINGS |
|---|---|---|---|
| 1. | Whether prima facie case lies in favour of Plaintiff? | :- | **Affirmative** |
| 2. | Whether balance of convenience lies in favour of Plaintiff ? | :- | **Yes** |
| 3. | Whether Plaintiff would suffer irreparable loss if injunction is refused ? | :- | **Yes** |
| 4. | What order? | :- | **As per final order** |

**-: R E A S O N S :-**

**For point no. 1 to 3:-**

Point no. 1, 2 and 3 are inter related therefore they are discussed conjointly for the sake of convenience.

6. Suit of Plaintiff is for perpetual injunction and mandatory injunction. The Plaintiff has prayed to restrain Defendant permanently from interfering with the possession of Plaintiff over the suit property by way of perpetual injunction. The Plaintiff has also prayed to direct the Defendants to demolish the alleged illegal construction by way of mandatory injunction.

7. Plaintiff has filed documents vide list at Exh. 3 on record. At Sr. No. 1 of Exh. 3 is the 7/12 extract of Gat No. 196/2 which reveals that Plaintiff is in possession of 0.05.61 R land vide mutation entry bearing No. 15704. At Sr. No. 2 is the copy of registered Sale Deed dated 08/09/2023 bearing No. 2720/2023 which reveals that vendor Anton Luis Farnandis and

others had sold the suit property to the Plaintiff. It clearly mentions the boundaries which are described in the plaint. At Sr. No. 3 and 4 are the Written Complaints made by Plaintiff to the Police Inspector and Chief Officer, Murgud which reveals that Plaintiff had approached the legal authorities informing them about illegal construction carried out by Defendants. At Sr. No. 5 of list at Exh. 3 are the photographs which shows some part of construction. The Plaintiff has also filed the measurement map of Gat No. 196/2 vide list at Exh. 26. This map is prepared by Engineer and Land Surveying Consultants.

8. The Plaintiff has also filed the 7/12 extract of Gat No. 198/1/B on record vide list at Exh. 17. On perusal of 7/12 extract of Gat No. 198/1/B it reveals that Shantabai Tanaji Chavan is in joint possession along with Sagar Arjun Patil, Yogesh Shivaji Patil, Gajanan Gundopant Patil, Kiran Vitthal Gavankar in land admeasuring 0.12 R.

9. It is an admitted fact that Plaintiff is the owner and possessor of land Gat No. 196/2. Defendant have not denied that Plaintiff became owner of land Gat No. 196/2 admeasuring 0.5.61 R land vide registered Sale Deed No. 2740 dated 08/09/2023. The only contention of Defendants is that they are carrying out construction in the land owned by them in Gat No. 198/1/B. The Defendants have not denied that they are not carrying out construction. The Plaintiff have specifically pleaded that the said construction of Defendant is in the land owned by them and they have encroached on the land owned by Plaintiff. It is specifically pleaded that the construction of Defendant is an

encroachment on land owned by Plaintiff. Hence Plaintiff have made out the triable issue. The possession of the Plaintiff over the suit property i.e. land Gat No. 196/2 is not disputed.

10. It is settled principle of law that at the time of determination of application for temporary injunction the factum of possession would only be the relevant factor. The contention of Defendant with respect to encroachment would be decided at the time of trial by way of adducing evidence or by measurement of the properties as per the procedure prescribed by law. But at this stage if the Defendants are allowed to continue with the construction then more hardship and irreparable loss will be cause to the the Plaintiff as compared to the Defendants. The photographs shows that already major part of the construction is completed. In such circumstances if the construction is allowed to be completed then it will hamper the right of Plaintiff without any trial. The Plaintiff has made out the strong prima facie case. Accordingly I answer point no. 1, 2 and 3 in favour of Plaintiff/Applicant. In answer to issue no. 4 I pass following order.

**ORDER**

1. Application below Exh. 5 and Exh. 11 are allowed.
2. Defendants or their agents are restrained by way of temporary injunction from interfering with possession of Plaintiff over the suit property and carrying out construction in the suit property

bearing Gat No. 196/2 admeasuring 0.5.61 R and more specifically described in paragraph No. 1 of the plaint till the final disposal of the suit.

3. Cost in main cause.

(A.B.Madake)
Civil Judge Junior Division,Kagal.

Kagal.
Date:- 11/12/2025

Read & Compared by

"True Copy"
31/1/26
Assit. Supdt.
Civil Court Jr Dn Kaga

अ नं (2) अर्जदारतर्फे दाखल,

प्रति,
मा. जिल्हा पोलीस प्रमुखसो,
कसबा बावडा, कोल्हापूर

यांना........

अर्जदार :— जगजित श्रीकांत भोसले
व.व.४४, रा.९४८, 'बी' वॉर्ड, रविवार पेठ,
कोल्हापूर

विषय :— माझे स्वतःचे मालकीची मिळकत मौजे मुरगुड येथील गट नंबर १९६/२ मध्ये राजेंद्र नानासो चव्हाण हा इसम मे.कोर्टाची मनाई असताना बांधकाम करीत असलेने व मला शिवीगाळ व धमकी दिलेबाबत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत.

23/01/2026

आरोपी :— राजेंद्र नानासो चव्हाण
रा. पाटील गल्ली, मुरगुड ता. कागल,
जि. कोल्हापूर

महोदय,

मी जगजित श्रीकांत भोसले वरील पत्यावर राहणेस असून सदर मौजे मुरगुड येथील गट नंबर १९६/२ मधील एकूण क्षेत्र हे.०.१९.२० आर पैकी क्षेत्र हे.०.०५.६१ आर ही मिळकत मी रजिस्टर दस्त नं.२७४० ने दि.८/९/२०२३ इ.रोजी श्री. अन्तोस लुईस फर्नांडीस यांचेकडून रक्कम रुपये १०,३०,०००/— चा योग्य मोबदला देवून खरेदी केलेली आहे.

२/—

सदर माझे मालकीच्या मिळकतीमध्ये राजेंद्र नानासो चव्हाण हा इसम दांडगाव्याने व बेकायदेशीरपणे माझे मालकीचे मिळकतीमध्ये बांधकाम करीत असलेने मी मा. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल यांचे कोर्टात रे.क.नं.१५६/२०२५ हा दावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये नि.५ तुर्तातुर्त मनाई अर्ज मा.न्यायालयाने दि.११/१२/२०२५ इ. रोजी मंजूर केलेला आहे. व राजेंद्र नानासो चव्हाण यांचे विरुध्द माझे मिळकतीत बांधकाम करु नये व माझे कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये असा मनाई आदेश दिलेला आहे.

मा. न्यायालयाचा मनाई आदेश असताना सदर राजेंद्र नानासो चव्हाण हा बांधकाम करीत असून त्याने पहिले मजल्याचे स्लॅब ता. १०/१/२०२६ इ.रोजी टाकलेले आहे. त्यावेळी देखील मी त्यास बांधकाम बंद ठेवणेबाबत बजावले होते, तथापि तो ऐकणेस तयार नाही. मी ता.२२/१/२०२६ इ.रोजी मुरगुड येथे गट नं.१९६/२ मधील माझे मिळकतीत गेलो असता सदर राजेंद्र नानासो चव्हाण हा मला भेटला, तो स्वत: तेथे उभा राहून कामगारामार्फत बांधकाम पूर्ण करुन घेत होता. सदर राजेंद्र नानासो चव्हाण यांचे कामगार हे भिंती बांधणे, गिलावा करणे इत्यादी बांधकामाची कामे करीत होते. त्यावेळीस मी त्यास मा. न्यायालयाची मनाई आहे, बांधकाम करु नकोस असे समजावण्याचा प्रयत्न केला. तथापि त्याने मला “मी कोर्ट वगैरे काय मानत नाही, तु मला कोण सांगणार जा येथून नाहीतर तुला ठार मारतो” अशी मला धमकी दिली. त्यामुळे मी सोबतचे फोटोग्राफर करुन सदर चालू बांधकामाचे फोटो काढून घेतले.

सदर राजेंद्र नानासो चव्हाण हा गुंड प्रवृत्तीचा इसम असून त्याचे पासून माझे जिवीतास धोका आहे. त्यांचे विरुध्द कडक कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच मुरगुड येथील स्थानिक पोलीस हे राजेंद्र नानासो चव्हाण याचे ओळखीचे असलेने त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई करीत नाहीत.

सबब माझी विनंती की,

राजेंद्र नानासो चव्हाण रा. पाटील गल्ली, मुरगुड, ता. कागल, जि. कोल्हापूर याचे विरुध्द मला धमकी दिलेबाबत व मा.न्यायालयाचे मनाईचा भंग करुन बांधकाम करीत असलेबाबत कारवाई करणेत यावी ही नम्र विनंती.

कोल्हापूर

दि.२३/०१/२०२६

जगजित श्रीकांत भोसले
अर्जदार

अ नं (3) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (4) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (5) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (6) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (7) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (8) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (9) अर्जदारतर्फे दाखल




अ नं (10) अर्जदारतर्फे
दाखल



अ नं (11) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (12) अर्जदारतर्फे दाखल



अ नं (13) अर्जदारतर्फे
दाखल

# VITTAL ADULKAR PHOTOGRAPHY

**Date Issued:**
22-01-2026

**Invoice No:**
0123422

**Issued to:**
Jagjeet Shrikant Bhosale
+919371839297

| NO | DESCRIPTION | QTY | PRICE | SUBTOTAL |
|---|---|---|---|---|
| 1 | Murgud Tal. Kagal madhil 196/2 ya Gat no varil property che photo | 1 | ₹6000/- | ₹6000/- |
| | | | **GRAND TOTAL** | **₹6000/-** |

V A PHOTOGRAPHY
Sutar Mala, Jivhala Colony,
Kolhapur

Manager

अ नं (14) अर्जदारतर्फे दाखल.

प्रमाणपत्र

मी श्री. विठ्ठल पांडुरंग आडुळकर रा. व्ही ए फोटोग्राफी, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापुर प्रमाणपत्र लिहुन देतो की.

मी सन २०२२ पासुन व्ही ए फोटोग्राफी या नावाने लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापुर येथे फोटोग्राफीचा व्यवसाय करीत असुन माझा स्वतःचा डिजीटल कॅमेरा आहे. ता.२२.०१.२०२६ रोजी मी मुरगुड ता.कागल जि.कोल्हापुर येथील गट नं.१९६/२ या मिळकतीमधील चालु असलेले आरसीसी बांधकामाचे फोटो माझे कॅमेऱ्याने काढले असुन ते कॅमेऱ्याचे मेमरी कार्ड मध्ये साठा झालेले होते. ते मेमरी कार्ड मी माझे कार्यालयातील संगणकास जोडुन संगणकामध्ये कॉपी करून घेतले व प्रिंटरच्या सहाय्याने त्याची प्रिंट घेतलेली आहे. सदर माझा संगणक हा माझा दैनदींन वापरातील आहे. सदर संगणक हा सुस्थीतील असुन मी स्वतः संगणकामधील फोटो ता.२२.०१.२०२६ रोजी मेमरीकार्ड मध्ये कॉपी केले आहेत. सदरप्रमाणे कॉपी केलेनंतर मी ते तपासुन पाहीले आहेत. तसेच सदरचे १५ फोटो मी प्रिंट काढुन श्री.जगजीत श्रीकांत भोसले यांना दिलेले आहेत.

माझे कार्यालयातील संगणक माझे शिवाय अन्य कोणीही हाताळत नसुन तो कोड नंबर व सिक्युरीटी पासवर्ड ने सुरक्षीत आहे. सदर संगणकामधील सर्व डाटा व माहीती सुरक्षीत आहे. मी फोटो काढले प्रमाणे व वस्तुस्थीतीप्रमाणे फोटो व मेमरी कार्ड आहे.

सदर प्रमाणपत्रातील सर्व मजकुर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

कोल्हापुर

ता.२२.०१.२०२६

V A PHOTOGRAPHY
Sutar Mala, Jivhala Colony,
Kolhapur

श्री. विठ्ठल पांडुरंग आडुळकर